# Greenlawns School, Worli

वार्षिक परीक्षा (२०२५- २०२६)

मराठी

इयत्ता :- पाचवी | पूर्णांक:- ८०

दिनांक :- १८ .०२.२०२६ | वेळ –२ तास

सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (०८)

१. माझा आवडता पक्षी

२. भाजी मंडई

३. माझी आई

प्रश्न २) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : -

कविताचे कुटुंब खूप मोठे आहे. तिला एक लहान भाऊ गौरव आहे आणि लहान बहीण लक्ष्मी आहे. तिचे आजी, आजोबा आणि तिची आत्या तिच्याकडे राहतात. सगळे मिळून घरातील कामे करतात. तिची आई सर्वांसाठी जेवण बनवते. कविता आईच्या मदतीने भाजी धुऊन देते आणि टेबलावर जेवण वाढण्यात मदत करते. तसेच ती घरातील कामे करण्यात आईला मदत करते. आत्या घराची साफसफाई करते .आजोबा बागेला पाणी घालतात. आजी लक्ष्मीला सांभाळते . तर बाबा बागेतील गवत कापण्याचे काम करतात. कवितेच्या घरातील सगळेजण एकमेकांना मदत करतात. कुटुंबातील सर्वजण एकत्र टीव्ही बघतात. सुट्टीच्या दिवशी घरातील लहान मुले आजोबांबरोबर फिरायला जातात. कविताचे कुटुंब एक सुखी कुटुंब आहे. कुटुंबातील सगळ्यांचे एकमेकांवर प्रेम आहे. अशाप्रकारे एकत्र राहण्याचा आनंद हा काही वेगळाच असतो.

प्रश्न

१) कविताचे कुटुंब कसे आहे ? तिच्या बहीण व भावाचे नाव काय आहे ? (२)

२) कविताच्या कुटुंबात कोण - कोण आहेत ? (२)

३) कविताच्या घरात जेवण कोण बनवते ? कविता घरात काय काम करते ? (२)

४) कविताची आत्या, आजी, आजोबा व बाबा कोणते कार्य करतात ? (२)

## <u>व्याकरण - विभाग</u>

प्रश्न ३) अ) समानार्थी शब्द लिहा :- (३)

१. माया २. कथा ३. हात

आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (३)

१. गुणी २. खरेदी ३. आपला

इ) लिंग बदला :- (३)

१. आजोबा २. राजकन्या ३. सेवक

ई ) खालील संख्या अक्षरात लिहा :-. (३)

1. ७७ - २. ८४ - ३. ९३ -

उ) कोणत्याही ३ फुलांची नावे लिहा. (३)

ऊ) कोणत्याही ३ पालेभाज्यांची नावे लिहा.. (३)

ऋ) कोणत्याही दोन फळांची नावे लिहा. . (२)

ए) खालील वाक्यात विशेषण ओळखा :- (२)

१. मारियाचे घर सुंदर आहे.

२. बाबांनी नवीन सायकल आणली.

ऐ) खालील वाक्यात क्रियापद ओळखा :- (२)

१. बाबांनी आईला पैसे दिले.

२. गौरी पुस्तक वाचते.

## साहित्य – विभाग ( अंक – ४० )

प्रश्न ४ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (९)

1. मारियाने दारे, खिडक्या बंद का केल्या?
2. मधमाशीने फुलपाखराचा कोणता गुण सांगितला आहे? फुलपाखराला कोणती गोष्ट आवडत नाही?
3. नदीच्या पाण्याचा उपयोग लोक कशासाठी करतात ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)

१. नदी आपल्याला कोणता संदेश देते ?
२. फुलपाखरु मधमाशीला कुठे गप्पा मारायला बोलवत आहे ?
३. कोणत्या गोष्टीत आनंद असतो, असे मधमाशी म्हणते ?
४. नदी मोठी कशी होते ?

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा - (४)

१. ------------- वारा सुटला आहे.
२. माझ्या दोन्ही किनाऱ्यांवरील परिसर मी ------------करते.
३. माणसांच्या वस्त्या, छोटी गावे,शहरे मी यांच्या जवळून वाहत जाताना मी जास्तच .................. होते.
४. पावसाचा आवाज कमी झाला अन् मारियाने ...........उघडली.

ई) कोण - कोणास म्हणाले :- (३)

१. “थांब ना जरा."
२." अरे ,मध हा औषधीच आहे."
३. "शेवटी ती माणसांचीच धन ना!”

उ) एक ते दोन शब्दात उत्तरे लिहा :- (२)

१. थुई थुई नाचणारे-
२. मारियाचे आईबाबा कुठे गेले होते -

उ) शब्दार्थ लिहा :- (३)

१. दरवळणे

a. नाचणे

b. पसरणे

c. गाणे

d. हसणे

२. अडवणे

a. थांबणे

b. थांबावणे

c. थांबवने

d. थांबवणे

३. बिलगणे

a. जोरजोरात आदळणे

b. हळू आवाजात गाणे

c. प्रेमाने मिठी मारणे

d. खूप जोराचा पाऊस पडणे

## <u>कविता – विभाग</u>

प्रश्न ५) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:-

1. 'कोणापासून काय घ्यावे' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा. (३)
2. पतंग कोणासारखे तरंगतात? (१)
3. ‘ कोणापासून काय घ्यावे’ या कवितेच्या कवीचे नाव लिहा? (१)

आ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

प्रभातकाळी--------------------

----------------------------

---------------------------

----------------------------

---------------------------- हसूया.

इ) खालील दिलेल्या शब्दांचे यमक जुळणारे शब्द लिहा:- (२)

१. बरोबर - २. गाणे -

ई) कवितेतील कोणाकडून काय घेता येईल ते लिहा. (२)

१.माती-

२.चंद्र-

उ)योग्य शब्दार्थ निवडून लिहा :-. (२)

१. कांती -

a. रंग
b. संध्याकाळ
c. पहाट
d. तेज

२. त्याजला -

a. त्याला
b. त्यला
c. तयाला
d. त्याल

-----------×समाप्त ×---------------